आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१६ मे २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला मंजूर केलेल्या आर्थिक मदतीचा फेरविचार करावा असं संरक्षण मंत्र्यांचं आवाहन

- जम्मू काश्मीरमध्ये कुलगाम आणि पुलवामा जिल्ह्यांत सुरक्षा दलांच्या संयुक्त मोहिमांमधे सहा दहशतवादी ठार

- तुर्कीयेमधे इस्तंबूल इथं रशिया आणि युक्रेनच्या शिष्टमंडळांची बैठक सुरु

- सन २०२३ चा ज्ञानपीठ पुरस्कार जगद्गुरू रामभद्राचार्य यांना प्रदान

**आणि**

- महाराष्ट्रात संपूर्ण आठवडा पावसाचा

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं पाकिस्तानला मंजूर केलेल्या आर्थिक मदतीचा फेरविचार करावा असं आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. ते आज गुजरातमधे भुज इथल्या वायुसेना तळावर जवानांना संबोधित करत होते. नाणेनिधीनं दिलेल्या मदतीचा मोठा भाग दहशतवादी कारवायांवर खर्च होण्याची शक्यता असल्याचं ते यावेळी म्हणाले. ऑपरेशन सिंदूर मधल्या वायुसेनेच्या कामगिरीची त्यांनी प्रशंसा केली.

पाकिस्तानशी केलेली शस्त्रसंधी म्हणजे लष्करी कारवाईला पूर्णविराम नसून केवळ अल्पविराम आहे. वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर जसं पोलीस लक्ष ठेवून असतात त्याप्रमाणे आम्ही पाकिस्तानवर लक्ष ठेवून आहोत, आणि पाकिस्ताननं पुन्हा काही आगळीक केली तर त्यांना आपलं सैन्यदल धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही असा इशारा संरक्षण मंत्र्यांनी यावेळी दिला.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये कुलगाम आणि पुलवामा जिल्ह्यांत  सुरक्षा दलांच्या दोन संयुक्त मोहिमांमधे सहा दहशतवादी ठार झाले.  भारतीय लष्कर , केंद्रीय राखीव पोलीस दल आणि पोलिसांनी श्रीनगर इथे घेतलेल्या संयुक्त वार्ताहर परिषदेत आज ही माहिती देण्यात आली. दोन्ही मोहिमा ४८ तासांत यशस्वीपणे पूर्ण झाल्या असून त्यात आपल्या सुरक्षा दलांची जीवितहानी झाली नसल्याचं लष्करी अधिकाऱ्यांनी सांगितलं. सर्व सुरक्षादलांमधला समन्वय आणि स्थानिक नागरिकांचं सहकार्य या मोहिमेत महत्वाचं ठरलं  असंही लष्करी अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

तुर्कीयेमधल्या इस्तंबूल इथे रशिया आणि युक्रेनच्या शिष्टमंडळांची आज बैठक सुरु असून ही दोन्ही देशांमधली गेल्या तीन वर्षांमधली पहिली बैठक आहे. युक्रेनच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व संरक्षण मंत्री रुस्टम उमरोव्ह करत असून रशियाच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व अध्यक्षांचे सहायक व्लादिमिर मेडिन्स्की करत आहेत. भविष्यात होणाऱ्या, दोन्ही देशांच्या अध्यक्षांच्या बैठकीसाठी पूर्वपीठिका तयार करण्याचं काम या बैठकीत होत आहे, असं तुर्कीयेचे परराष्ट्र मंत्री हाकान फिदान यांनी म्हटलं आहे. ते या बैठकीचे अध्यक्ष आहेत.

या बैठकीच्या आधी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो नाटो देशांच्या बैठकीत सहभागी होऊन इस्तंबूल इथं पोचले आहेत. अमेरिका आणि रशियाच्या प्रतिनिधींमध्येही एक छोटी बैठक नुकतीच पार पडली आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी भाजपातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. २३ मेपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे.

**नागपूरमधे** कामठी इथं आज महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत तिरंगा यात्रा काढण्यात आली. यात्रेच्या सुरुवातीला बावनकुळे यांनी मुख्य चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना दिली. देशातली १४० कोटी आणि महाराष्ट्रातली १४ कोटी जनता ही भारतीय सैन्याच्या पाठीशी आहे, असं बावनकुळे यावेळी म्हणाले.

**होल्ड ---बाईट बावनकुळे**

**सोलापूर** शहरात देखील आज तिरंगा रॅली काढण्यात आली. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते अशोक चौकातल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या रॅलीचा प्रारंभ करण्यात आला. **लातूर** जिल्ह्यातल्या उदगीर इथं, तसंच **जालना** जिल्ह्यातल्या अंबड आणि बदनापूर शहरातही भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली.

**जळगाव** शहरातही तिरंगा यात्रा काढण्यात आली, यावेळी सचिन नारळे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली....

**होल्ड बाईट - सचिन नारळे (१७ सेकंद)**

बुलढाण्यातले माजी सैनिक सुभेदार **दिवाकर फंदाट** यांनी ऑपरेशन सिंदूर बाबत आपली प्रतिक्रिया दिली..

**होल्ड बाईट - सुभेदार दिवाकर फंदाट( २७ सेकंद)**

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाच्या विरोधात भारताची भूमिका पटवून देण्यासाठी विविध देशांना सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठवण्याचा विचार सरकार करत आहे. या शिष्टमंडळात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या खासदारांचा समावेश असेल. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी याविषयी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांच्याशी चर्चा केल्याचं काँग्रेस

नेते जयराम रमेश यांनी वार्ताहरांना सांगितलं. पुढल्या आठवड्यापासून ही शिष्टमंडळं विविध देशात जातील.

**<><><><>**

संस्कृत भाषापंडित जगद्गुरू रामभद्राचार्य यांना २०२३ सालचा ज्ञानपीठ पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. नवी दिल्लीत विज्ञान भवनात आज झालेल्या  ५८ व्या ज्ञानपीठ पुरस्कार वितरण समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या साहित्यविषयक पुरस्कारांचं वितरण झालं. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन्ही पुरस्कारविजेत्यांचं अभिनंदन केलं. समाजाला जागृत करून एकत्र आणण्याचं महत्वाचं काम साहित्य करते, १९ व्या शतकाच्या समाजप्रबोधनाच्या काळापासून २० व्या शतकातल्या स्वातंत्र्यलढ्यापर्यंत लेखक आणि कवींनी समाजाला एकत्र आणण्यात महत्वाची भूमिका बजावली होत असं असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी म्हटलं .

आपल्या साहित्यसेवेचा योग्य सन्मान झाल्याची भावना यावेळी जगद्गुरू रामभद्राचार्य यांनी व्यक्त केली. गुलजार प्रकृती अस्वास्थ्यामुळे समारंभाला उपस्थित राहू शकले नाहीत, परंतु या पुरस्काराबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

**<><><><>**

गेल्या चोवीस तासात संपूर्ण महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ, तर  तुरळक ठिकाणी किंचित घट झाली. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी कमाल तापमानात घट झाली.

राज्याच्या चारही विभागांमधे पुढचा आठवडाभर तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**<><><><>**

देशाच्या वस्तू आणि सेवा निर्यातीत गेल्या वर्षीच्या तुलनेत १२ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांची वाढ झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं सांगितलं आहे. गेल्या महिन्यात ७३ अब्ज ८० कोटी डॉलर्सची निर्यात करण्यात आली. मागच्या वर्षी याच काळात ६५ अब्ज ४८ कोटी डॉलर्स इतकी निर्यात झाली होती. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं संकलित केलेल्या आकडेवारीनुसार, देशाच्या वस्तू निर्यातीत या महिन्यात ९ पूर्णांक ३ शतांश टक्क्यांनी वाढ होऊन ती ३८ अब्ज ४९ कोटी डॉलर्स झाली आहे. एप्रिल मधे देशाची एकूण वस्तू आणि सेवांची आयात ८२ अब्ज ४५ कोटी असून मागील वर्षीच्या तुलनेत ती १५ पूर्णांक ७२ शतांश टक्क्यांनी वाढली आहे.

**<><><><><>**

भारताच्या परकीय चलन साठ्यात गेल्या आठवडयाच्या अखेरपर्यंत ४५५ कोटी डॉलर्सची भर पडल्यानं तो ६९ हजार ६० कोटी डॉलर्सवर पोहोचला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेनं जारी केलेल्या आकडेवारीनुसार गेल्या आठवड्यात परकीय चलन मालमत्ता १९ कोटी ६० लाख डॉलर्सनं वाढून ५८ हजार १३० कोटी डॉलर्सपेक्षा जास्त झाली आहे. सोन्याच्या साठ्यात ४५० कोटी डॉलर्सची वाढ होऊन ती एकूण ८ हजार ६३३ कोटी डॉलर्सवर पोहचली आहे.

**<><><><><>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं इंग्लंडच्या दौऱ्यासाठी महिला संघाची घोषणा केली आहे. २८ जून ते २२ जुलै या दरम्यान हा दौरा आहे. या दौऱ्यात दोन्ही संघादरम्यान पाच टी-ट्वेंटी तर तीन एकदिवसीय क्रिकेट सामने खेळले जाणार आहेत. या दोन्ही प्रकारच्या सामन्यासाठी भारतीय संघाचं कर्णधारपद हरमनप्रीत कौर हिच्याकडे तर उपकर्णधारपद स्मृती मंधाना हिच्याकडे असेल.

**//<><><><><>//**